


# महावतार श्रीबाबाजी, लाहिरीमहाशय

व इतर

प्रा. हेमलता सुधाकर जोशी



आद्य शंकराचार्यांनी सद्गुरुंची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, तिन्ही लोकात तुलना होऊ शकेल असा सद्गुरु समान कोणीही नाही. जर परिस तसा आहे असे मानले तर परिस फक्त लोखंडाचेच सोन्यात रुपांतर करू शकतो दुसऱ्या परिसात नाही. याउलट सद्गुरू आपल्या चरणांचा जो आश्रय घेतो अशा शिष्याला आपल्यासारखाच बनवतो.....

''वर्तमान युगाचे योगी भगवान बाबाजी'' असे परमहंस योगानंदांनी ज्यांचे वर्णन केले ती सर्व वैशिष्ट्ये सर्वार्थाने लागू पडतात यात संशयच नाही. बद्रीनारायण जवळील उत्तर हिमालयाचा भूभाग लाहिरी महाशहायांचे गुरु बाबाजी यांच्या जिवंत वास्तव्याने अजूनही पवित्र झालेला आहे. या एकांतवासात रमणाऱ्या महापुरुषाने आपला देह अनेक शतकांवर अमर ठेवलेला आहे. कदाचित सहस्त्रावधी वर्षे सुद्धा! 'अवतार' या शब्दाचा अर्थ हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे 'परमेश्वराने हाडामासांचा देह धारण करणे' असा आहे. युक्तेश्वरांनी योगानंदांना सांगितले होते की, बाबाजींच्या आध्यात्मिक अवस्थेची कल्पना मानवी मनाला करता येण्यासारखी नाही. त्यांच्या अवतारी कार्याच्या स्वरुपाचे आकलन करण्याचा प्रयत्न सुद्धा कोणास करता येणार नाही. त्यांचे ज्ञान होणे अशक्य आहे! हे अवतार म्हणजे या भूलोकावर स्वर्गीय कृपाप्रसादाचा वर्षाव करण्यासाठी परमेश्वराने नियुक्त केलेले माध्यमत्व!

अज्ञान आणि भौतिक बंधनांपासून बाबाजी मुक्त आहेत. अवतारी पुरुषांना आपले खास कार्य पार पाडता यावे म्हणून त्यांना मदत करण्याचे कार्य बाबाजींनी घेतलेले आहे. हे अवतार म्हणजे कृष्ण, राम, बुद्ध, पतंजली आणि अगस्ती ऋषी! बाबाजींबद्दल इतिहासात कुठेही प्रगट उल्लेख नाही. त्यांचे कार्य अत्यंत गुप्तपणे आणि शांतपणे परमेश्वरासारखे चाललेले असते. इतिहासातील एखादा ठळक प्रसंग घडवून आणण्यापेक्षा मनुष्य जातीच्या शतकाशतकातून होत जाणाऱ्या उत्क्रांतीमध्ये प्रगती घडवून आणण्याचे कार्य ते करीत असतात. बाबाजींचा येशू ख्रिस्ताशी संबंध असतो. विचारस्पंदने ते प्रसृत करतात. 'प्राणीमात्रांची मुक्तता' हे महत्त्वाचे ध्येय त्यात असते. या आध्यात्मिक तंत्रातील हेतू म्हणजे राष्ट्राराष्ट्रांना परस्परांशी युद्ध करणाऱ्यापासून, परस्परांच्या द्वेषापासून परावृत्त करणे, धार्मिक बाबतीत, पंचवादापासून अलिप्त ठेवणे, भोगवादांच्या आपत्तीपासून त्यांना वाचवणे अशा स्वरुपाचे असते.

अमर अशा या परमगुरुंच्या शरीरावर वयाची खूण नाही. ते नेहमी तरुणच दिसतात. 'एखाद्या पंचवीस वर्षाच्या युवकाप्रमाणे देखणे असतात. गौरवर्णीय, मध्यम शरीर यष्टीचे, उंच, सुंदर आणि सदृढ शरीर' असे त्यांचे वर्णन करता येते. त्यांचे डोळे काळभोर, मोठे, स्थिर आणि नाजूक, केस लांबलचक आणि ताम्रवर्णीय होते. बाबाजींचा चेहरा त्यांचे परमप्रिय शिष्य लाहिरी महाशयांसारखा दिसतो. ते सर्व भाषांमध्ये सफाईने बोलतात. त्यांच्याभोवती तेजोवलय असते. त्यांची जेव्हा इच्छा असते तेव्हाच ते इतरांच्या दृष्टीस पडतात अथवा त्यांना ओळखू येतात. योगसाधनेच्या मोक्षदायी मार्गाची शिकवण पश्चिम व पूर्वेस सारख्या प्रमाणात देण्याची जरुरी आहे असे त्यांना वाटते. अशा या सर्वश्रेष्ठ महावतार बाबाजींच्या शिष्य परंपरेमध्ये क्रियायोगाचे पुनरुज्जीवन करणाऱ्या लाहिरी महाशय, शंकराचार्य, महात्मा कबीर, योगी एस., ए.ए.रामय्या, व्ही.टी. नीलकांतन् या नामवंतांचा समावेश होतो.

आद्य शंकराचार्यांनी सद्गुरुंची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, तिन्ही लोकात तुलना होऊ शकेल असा सद्गुरु समान कोणीही नाही. जर परिस तसा आहे असे मानले तर परिस फक्त लोखंडाचेच सोन्यात रुपांतर करू शकतो दुसऱ्या परिसात नाही. याउलट सद्गुरू आपल्या चरणांचा जो आश्रय घेतो अशा शिष्याला आपल्यासारखाच बनवतो. म्हणून गुरु

अलौकिक आणि अतुलनीय असतात! गुरु शिष्यातील निद्रिस्त ईश्वराला जागृत करणारा ईश्वर असतो. प्रेमाच्या अत्यंत हळूवार स्पर्शाने प्रगत साधकातील जवळ जवळ पूर्ण जागृत असलेल्या ईश्वराला तो तत्काळ जागवतो. ईश्वराच्या प्रमाणेच गुरुच्या उदारतेला सीमा नसते.

गुरु शिष्य संबंधातील महत्वाचा भाग म्हणजे गुरुवर निष्ठा! विना अट एकनिष्ठ राहून गुरु आणि त्यांची शिकवण यावर लक्ष केंद्रित करणारा तो शिष्य खरा होय. गुरु उपदेशाचे आज्ञापालन आणि त्यांना समर्पित होणे हेही महत्त्वाचे. आपला अहंकार नष्ट करून अत्यंत आदराने गुरुंना समर्पित होणे अत्यंत आवश्यक आहे. गुरु शिष्य संबंध चिरंतन असतो. जन्मजन्मांचा असतो गुरुदीक्षा स्वीकारल्यानंतर गुरुशिष्यांमधे एक भावनात्मक बंध निर्माण होतो.

या सर्व पार्श्वभूमीवर महावतार बाबाजी आणि क्रियायोगाचे महत्व संपूर्ण जगाला पटवून देणारे लाहिरी महाशय या गुरु-शिष्यांचे नाते खरोखरीच फार मनोहर आहे, सुंदर आहे आणि हृद्य आहे. बाबाजींची आणि लाहिरी महाशयांची पहिली भेट खरोखरी फार रोमांचकारी आणि मंत्रमुग्ध करणारी आहे. लाहिरी महाशयांनीच आपल्या शिष्यांना स्वामी केवलानंद आणि श्रीयुक्तेश्वरजींना सांगितली होती. त्यामधून या दोघांच्या सुंदर नात्याचे फार विलोभनीय दर्शन घडते. लाहिरींचे वय त्यावेळी फक्त ३३ वर्षांचे होते. १८६१च्या पावसाळ्यात सरकारच्या मिलिटरी इंजिनिअरिंग खात्यात त्यांची अकौंटंट म्हणून दानापूरला नेमणूक झाली होती. एके दिवशी सकाळी ऑफिस मॅनेजरने त्यांना त्यांची बदली 'राणीखेत'ला जिथे लष्करी ठाणे आहे. तिथे झाल्याचे सांगितले. हिमालयातील या भागात लाहिरी एका घोड्यावरून एका नोकराला बरोबर घेऊन काम करायचे. ऑफिसमधल्या कामाव्यतिरिक्त ते हिमालयातील गिरीप्रदेशात भटकत असत. संतमहात्म्यांच्या दर्शनाची ओढ मनात होतीच. असेच तिसऱ्या प्रहरी भटकत असताना कुणीतरी दुरुन मारलेली हाक ऐकून ते आश्चर्यचकित झाले. द्रोणगिरी पर्वताची चढण चढत राहिले. यापुढील वर्णन स्वत: लाहिरींच्या शब्दात जास्त प्रभावी वाटेल.

"चढण चढल्यावर शेवटी मी एका लहानशा मोकळ्या जागी पोहोचलो त्याच्या चारही बाजूला गुहा होत्या. एका कड्याच्या कपारीवर एक स्मितमुखी तरुण मनुष्य उभा असलेला आढळला! तो माझे हाताने स्वागत करीत होता. त्या तरुणाचे माझ्याशी विलक्षण साम्य होते. फक्त त्याचे केस ताम्रवर्णीय होते. ते पाहून मला आश्चर्य वाटले.

"लाहिरी, आलास तू?" त्या महात्म्याने मोठ्या प्रेमाने मला हिंदीत विचारले. 'ह्या गुहेत जरा विश्रांती घे. मीच तुला ती हाक मारली।" मी त्या लहानशा गुहेत शिरलो. तिथे पुष्कळशा कांबळ्या आणि कमंडलू पडलेले होते.

लाहिरी, ते बसायचे आसन तुला आठवते काय? त्या योग्याने कोपऱ्यात घडी करुन ठेवलेल्या घोंगडी कडे बोट दाखवले. "नाही महाराज! मी म्हटले. मी गोंधळलो होतो. मी पुढे म्हणालो, "रात्र पडण्यापूर्वी मला येथून निघाले पाहिजे. उद्या सकाळी मला ऑफिसमध्ये काम आहे." त्या रहस्यमय योग्याने मला इंग्लिशमध्ये उत्तर दिले, "तुझ्याकरता ऑफिस येथे आणले आहे. ऑफिसकरता काही तुला येथे आणलेले नाही. मी आश्चर्याने अवाक झालो. अरण्यात राहणारा एक बैरागी चक्क इंग्लिश भाषेत सफाईदारपणे बोलत होता.

"माझ्या तारेचा परिणाम झाला तर एकूण!" या त्या योग्याच्या वाक्याचा अर्थ मी विचारला. तुझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याने तुझी बदली राणीखेतला करावी असे मीच त्याला गुप्तपणे सुचवले. मनुष्यमात्रांशी जो तादात्म्य पावतो त्याला सर्व माणसांची मने समजतात. आणि मग तो कोणत्याही माणसाच्या मनातून संदेश पाठवण्याचे कार्य करू शकतो. नंतर तो म्हणाला, "लाहिरी ही गुहा तुझ्या परिचयाची वाटत नाही तुला?"

माझ्याजवळ उत्तर नव्हते. मी अधिकच गोंधळलो. गप्प बसलो होतो. तेव्हा त्या साधुपुरुषाने जवळ येऊन माझ्या कपाळावर सौम्यसा आघात केला. लोहचुंबकासारखा तो स्पर्श झाल्यावर विस्मयकारी प्रवाह माझ्या मेंदूतून वाहू लागला. माझ्या पूर्व जन्मीच्या सुखद स्मृतींचे अवशेष आठवू लागले!!

"आठवते, सर्व आठवतेय मला!!" आनंदाच्या हुंदक्यांनी माझा आवाज अर्धाअधिक कुंठित झाला. "आणि माझे गुरु, बाबाजी आणि जे सदैव माझे आहात! माझ्या मनामध्ये पूर्वजन्मीची दृश्ये अगदी स्पष्टपणे दिसू लागली आहेत! माझ्या मागल्या जन्मी मी या गुहेत कित्येक वर्षे काढली आहेत." कधीही पुसल्या न जाणाऱ्या त्या पूर्वस्मृतींनी मला भारावून टाकले. साश्रू नयनांनी माझ्या गुरुदेवांचे मी पाय धरले. "तू परत येशील म्हणून तीस वर्षांवर मी तुझी सारखी वाट पहात

आहे! दिव्यप्रेमाने बाबाजींच्या आवाजाला नाद येऊ लागला.

तुझ्या मरणानंतर आयुष्याच्या वादळी लाटांमध्ये तू निसटलास. नाहीसा झालास. पण देदिप्यमान अशा सूक्ष्म विश्वसागरावर मी तुझा सारखा पाठलाग केला. वादळाच्या, लाटांच्या तांडवात पक्षीण जशी आपल्या पिल्लाला उरापोटी संभाळते तसा मी तुझ्या सारखा पाठीशी होतो. तुझा जन्म झाला. अर्भक म्हणून रांगतांना माझे डोळे तुझ्यावर लागलेले असत. नदीच्या वाळवंटात पद्मासन घालून ध्यान करायचास तेव्हा मी तुला डोळे भरुन पहायचो. मी अदृश्य अवस्थेत हजर असे. अशी अनेक वर्षे मी तुझी वाट पाहिली. आज तो दिवस, पूर्णावस्थेचा दिवस उगवला! तुझीही आवडती गुहा तुझ्यासाठी स्वच्छ करुन ठेवली आहे. हे तुझे पवित्र आसन! हा तुझा पितळी पेला! चकचकित पॉलिश करुन ठेवला आहे. बघ! माझ्या राजसा, आत्मन् समजले का तुला?

''गुरुजी, मी काय बोलणार? मी मोडक्या तोडक्या आवाजात पुटपुटलो. ज्या प्रेमाला अंत नाही असे हे प्रेम कधी कोणी पाहिले आहे काय? मी माझ्या गुरुदेवांकडे, जीवन आणि मरण या दोन्ही अवस्थातून, त्या माझ्या चिरंतन भांडाराकडे बराच वेळ भारावलेल्या नजरेने पहात राहिलो....

यानंतर बाबाजींनी लाहिरींची खूप काळजी घेतली. त्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली. तोही प्रसंग अतिशय चित्तवेधक आहे. कधीकाळी लाहिरींच्या मनात सुवर्णप्रासादातील सौंदर्य उपभोगण्याची इच्छा होती. लाहिरींसाठी बाबाजींनी तसा भव्य प्रासाद निर्माण करून त्यामध्ये त्यांना क्रियायोगाची दीक्षा दिली. त्यांच्या गौरवार्थ निर्माण करण्यात आलेल्या त्या प्रासादात काय नव्हते. हिरेमाणके आणि रत्नांनी तो प्रासाद झगमगत होता. हिरेजडित फुलदाण्या, उतमोत्तम सजविलेली दालने आणि एक भव्य दिवाणखान्यात रत्नजडित सिंहासनावर बसलेले बाबाजी! पद्मासनात बसलेल्या गुरुंच्या चरणांना लाहिरींनी वाकून नमस्कार केला.

''लाहिरी, सुवर्णप्रासाद पाहण्याची तुझी स्वप्नातील इच्छा अजून तृप्त झाली नाही काय?'' बाबाजींचे डोळे इंद्रनील मण्याप्रमाणे चमकत होते. '' ऊठ जागा हो. या तुझ्या ऐहिक वासना आता कायमच्या पूर्ण होणार आहेत. नंतर त्यांनी आशीर्वादात्मक गूढ शब्द उच्चारले. ''बेटा ऊठ, ईश्वराच्या साम्राज्यात प्रवेश करुन देणाऱ्या क्रियायोगाची दीक्षा घे....'' बाबाजींनी नंतर हात पुढे केले होम प्रज्वलित केला. सभोवार फळे व फुले ठेवलेली होती. त्या वेदातील अग्नी नारायणासमोर त्यांनी मोक्षदायक असे योग तंत्र मला शिकवले व मी त्याचा स्वीकार केला... आश्चर्य म्हणजे दीक्षा झाल्यानंतर पहाटे समाधी अवस्थेतून जागे झाल्यावर लाहिरींना दुसरा आश्चर्याचा धक्का बसला! सुवर्णप्रासाद नाहीसा होऊन त्या जागी ओबडधोबड खडक आणि जमिनीवर गिरिकंदाच्या गुहांच्या तोंडाशी बाबाजी आणि त्यांचे बसलेले शिष्य त्यांना दिसले. ''ज्या कार्याकरता हा प्रासाद उभा केला त्या कार्याची पूर्तता झाली आहे! '' बाबाजी म्हणाले.

जेव्हा लाहिरींनी बाबाजींच्या जवळच राहण्याची इच्छा प्रदर्शित केली, तेव्हा मात्र बाबाजींनी त्यांना परावृत्त केले आणि जो संदेश दिला तो फार महत्त्वाचा आहे. ''बेटा, या जन्मी तुला जनसमाजात राहून त्यांच्या डोळ्याला दिसेल असे कार्य करायचे आहे. लाहिरींना क्रियायोगाची दीक्षा देऊन या योगाचे पुनरुज्जीवन करताना बाबाजींचा दृष्टीकोन फार विशाल आहे. लाहिरींनी एकांतवासात, ध्यानधारणेत जीवन व्यतीत करण्यापेक्षा समाजात, लोकात मिसळून कार्य करण्याची त्यांना आज्ञा केली. एक आदर्श गृहस्थी योगी कसा असतो हे समाजाला कळले पाहिजे. ही जाणीव देताना बाबाजी म्हणतात, या जगातील गोंधळून गेलेल्या अनेक स्त्री-पुरुषांचा आक्रोश महात्म्यांच्या कानावर पडला आहे. अनेक निष्ठावंत साधकांना क्रियायोगाच्या द्वारे आत्मिक शांती देण्यासाठी तुझी निवड झालेली आहे. संसार करणाऱ्या, कर्मबंधनात अडकलेल्या गृहस्थाश्रमी लोकांना तुझ्यापासून दिलासा मिळेल. तू त्यांना समजावून सांगावेस की संसारी माणसांना सुद्धा अत्युच्च योगसाधना अप्राप्य नाही. जो योगी आपल्या जबाबदाऱ्या वैयक्तिक वासना न ठेवता प्रामाणिकपणे पार पाडतो त्याला मुक्तीचा, मोकळा मार्ग मोकळा असतो. तुझ्या कौटुंबिक व आध्यात्मिक कर्तव्यपूर्तीबरोबर तू त्यांच्या मनात एक दिव्य आशेचा किरण निर्माण करायचा आहेस. बाह्य वैराग्यापेक्षा आंतरिक वैराग्य मुक्तीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे.

क्रियायोग ही एक प्राचीन काळातील योगसाधना आहे. तमोयुगात नष्ट झालेली. लुप्त झालेली या साधनेचे बाबाजींनी पुनरुज्जीवन केले. साधनेच्या आचार पद्धतीचे तंत्र

स्पष्ट केले आणि जगाला एक अपूर्व आणि अमोल देणगी दिली. ते लाहिरींना म्हणाले, ''फार जुन्या काळी भगवान श्रीकृष्णांनी ही योगसाधना अर्जुनाला सांगितली. ती पुढे येशूख्रिस्त, सेंट जॉन, सेंट पॉल आणि त्यांच्या शिष्यांना पण माहित झाली. तिचे 'क्रियायोग' या नवीन नावाने पुनरुज्जीवन करुन १९व्या शतकात तुझ्या मार्फत मी जगास देत आहे!!

लाहिरी महाशयांनी पण बाबाजींच्या आज्ञेचे तंतोतंत पालन केले. ते क्रियायोगाची दीक्षा कोणत्याही धर्माच्या अनुयायांना देत असत. हे विश्वगुरु सर्वांचा शिष्य म्हणून स्वीकार करीत असत. त्यात द्वैतवादी, अद्वैतवादी, सर्व पंथ, धर्मातील लोकांचा समावेश असे. लाहिरी यांचे कार्य वाराणसी या गावी जास्त झाले. त्यांनी फार विचारपूर्वक क्रियासाधनेचे चार प्रगत टप्पे केले. पहिल्या टप्प्यात शिष्याने जर निश्चित आध्यात्मिक प्रगती केली तर ते त्याला वरच्या तीन टप्प्यांची दीक्षा देत, लाहिरी महाशयांनी २६ ग्रंथांचे योगिक भाष्य केले होते. त्यातील काहींची नावे अशी आहेत. गीता, वेदांतदर्शन, अष्टावक्र संहिता, सांख्य दर्शन, ओंकार गीत, गुरुगीता, चण्डी लिंग, पुराण, पातंजल योगसूत्र, पाणिनीय शिक्षा, अवधूतगीता.

योगीराज लाहिरी नियमितपणे संपूर्ण रात्रभर क्रियासाधना करीत असत. ते स्नानाला जात तेव्हा क्रियेच्या नशेत पूर्णपणे बुडालेले असत. ते कोणत्याही स्थूल मूर्तीची पूजा करीत नसत. अथवा देवदेवतांच्या मंदिरातही जात नसत. पण दर रविवारी काशीच्या बटुक भैरवाचे दर्शन घेण्यास जात असत. एका भक्ताने त्यांना विचारले, आपण ब्रह्मज्ञानी असताना भैरवाचे दर्शन करायला का जाता? तेव्हा लाहिरी गंभीर स्वरात म्हणाले, ''जर मी गेलो नाही तर तुम्ही लोक तिकडे जाणार नाही.... बाबाजींवर त्यांची एवढी श्रद्धा होती की, ते म्हणत असत, ''जो कुणी बाबाजींचे नाव अत्यंत प्रेमाने व आदराने घेतो, त्यांचे स्मरण करतो, त्याच्यावर बाबाजींची कृपा निश्चित होतेच! त्यांना बाबाजींचे मंगल आशीर्वाद मिळतात! श्यामाचरण लाहिरींनी २६ सप्टेंबर १८९५ रोजी आपल्या देहाचे विसर्जन केले.

### आदी शंकराचार्य (इ.स.७८८-इ.स. ८२०)

श्री बाबाजींनी आदी शंकराचार्यांना क्रिया कुंडलिनी प्राणायाम आणि ध्यानाची दीक्षा दिली. हे बाबाजींनी खुद्द स्वत: त्यांचे शिष्य लाहिरी महाशयांना सांगितले होते. बाबाजी हे शंकराचार्यांचे आध्यात्मिक गुप्त योगिक गुरु होते. ''गोविंदपाद हे त्यांचे शिक्षा गुरु (उच्चार शास्त्र, इंद्रियांचे शिक्षण) तर बाबाजी हे त्यांचे दीक्षा गुरु होते.'' असा उल्लेख योगानंदानी केलेला आहे.

### कबीर (इ.स. १४०७ - इ.स. १५१८)

१५ व्या शतकात हिंदू मुस्लीम जमातीत सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कबीर या श्रेष्ठ संताला आणि कवीला श्रीबाबाजींनी दीक्षा दिली होती. कबीराने ईश्वराच्या अद्वैत संकल्पनेची आणि मूर्तीपूजेपासून अलिप्त रहाण्याची शिकवण दिली. त्याने आपल्या पंथाचे दरवाजे हिंदु मुस्लिम अशा दोन्ही धर्मांसाठी मुक्त ठेवले होते. त्याच्या साधनपद्धतीचा अथवा योगिक पद्धतीचा अभ्यास करणारे शिष्य नादावर व दिव्य ईश्वरी आवाजावर भर देतात.

### श्रीयुक्तेश्वर गिरी महाराज (१८५५-१९३६)

हे लाहिरींचे शिष्य होते. बाबाजींना त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. 'होळी सायन्स' हे पुस्तक लिहून, अनेक साधू सभा केंद्रांच्या स्थापना करुन पुरी आणि सोमपूर येथे आश्रम स्थापून त्यांनी क्रियायोगाची ज्योत प्रज्वलित ठेवली. बाबाजींच्या आज्ञेनुसार आणि मार्गदर्शनानुसार १९२० मध्ये त्यांनी आपला प्रमुख शिष्य परमहंस योगानंदांना क्रियायोगाची शिकवण देण्यासाठी अमेरिकेत पाठवले.

### परमहंस श्री श्री योगानंद (१८९३-१९५२)

परमहंस योगानंद हे योगावर आधिष्ठित असलेल्या गूढ पौर्वात्य तत्वज्ञानाची ओळख पाश्चिमात्य देशात करुन देण्याच्या कार्याचे पहिले मार्गदर्शक आणि प्रणेते आहेत. पाश्चिमात्य लोकांना सहजगत्या समजेल आणि त्यांच्या श्रद्धापद्धतीने ते ताबडतोब मिसळून जाईल, एकजीव होईल अशा पद्धतीने योगानंदांनी भारतीय तत्वज्ञान मांडले. त्यांनी लिहिलेल्या 'Autobiography of a Yogi' या पुस्तकाने अक्षरश: लक्षावधी लोकांना या जगात स्फूर्ती दिलेली आहे, दिलासा दिलेला आहे. अनेक भाषांमध्ये या पुस्तकाची भाषांतरे आलेली आहेत. या त्यांच्या कार्यात मदत व्हावी म्हणून त्यांनी लॉस एंजेलिस येथे सेल्फ रियलायझेशन फेलोशिप (Self Realization Fellowship) या प्रमुख केंद्राची स्थापना केली. त्याच्या शंभरापेक्षा जास्त शाखा आज संपूर्ण जगात स्थापन झालेल्या आहेत. त्याचबरोबर भारतात दक्षिणेश्वर (वेस्ट

बंगाल) येथे योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना केली. १९१७ मध्ये रांची (बिहार) येथे प्रथम 'योगदा स्कूलची स्थापना केली. आज संपूर्ण भारतात तरुण मुलांना शारीरिक, नैतिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक आदर्श शिक्षण देणाऱ्या एकवीस शाळा आहेत. अनेक ॲलोपॅथिक, होमिओपॉथिक हॉस्पिटल्स, निरनिराळ्या कला व व्यवसायांचे शिक्षण देणारी विद्यापीठे आणि मेडिकल कॉलेजेस सुद्धा या संस्थेशी संलग्न आहेत.

योगानंदांनी २००,००० लोकांना क्रियायोगाचे शिक्षण दिले. श्रेष्ठ महात्मा, महात्मा गांधी आणि वनस्पती शास्त्रज्ञ ल्युथर बरबँक यांनाही क्रियायोगाचे शिक्षण दिले. 'जागृत निर्वाण' समजल्या जाणाऱ्या महासमाधीत ते जेंव्हा गेले तेंव्हा त्यांच्या शरीरावर अद्भुत दैवी परिवर्तन दिसून आले. त्यांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ एकवीस दिवस त्यांच्या शरीरावर ऱ्हासाचे, बिघाडीचे कसलेही चिन्ह नव्हते. लॉस एंजेलिस (अमेरिका) येथे 'फॉरेस्ट लॉन सिमेट्री' मध्ये त्यांच्या देहाचे चर्चच्या खाली असलेल्या दफनाच्या भुयारी खोलीत दफन करण्यात आले!

दक्षिण कॅलिफोर्निया येथे योगानंदांनी स्थापन केलेल्या सेल्फ रियलायझेशन फेलोशिप मठामध्ये आज ३०० संन्यासी आणि संन्यासिनी रहात असून त्यांचे कार्य पुढे चालवीत आहेत. अभ्यास केंद्रे, पत्रव्यवहाराद्वारा कोर्सेस आणि प्रकाशनाद्वारे ते सर्व साधकांच्या कार्यासाठी कार्ये करतात. क्रियायोग आणि योगानंदांनी शोधून काढलेले Self-energizing चे तंत्र यांची शिकवण देणारी मूळ केंद्र म्हणून Self Realization Fellowship आणि योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया मानली जातात. सध्या हे कार्य 'श्री दयामाता' यांच्या नेतृत्वाखाली चालू आहे!

श्री योगानंद आणि सद्‌गुरु बाबाजी यांची भेट सुद्धा अतिशय प्रभावी आहे, स्फूर्तिदायी आहे. अमेरिकेत अनोळखी प्रदेशात जाण्यासाठी गुरुंच्या आज्ञेनुसार (श्री युक्तेश्वरजी) ते तयारी करायला लागले. पण पाश्चिमात्य जगाच्या जडवादी आणि भोगवादी जीवनात परिवर्तन कसे घडवायचे? या विचाराने ते अस्वस्थ झाले. त्यासाठी दिव्य शक्तीच्या प्रत्यक्ष अनुज्ञेची, परवानगीची ते प्रतिक्षा करीत होते!

योगानंद म्हणतात, ''एके दिवशी सकाळी मी प्रार्थनेला बसलो आणि मनाशी दृढनिश्चय केला की मेलो तरी बेहतर पण परमेश्वराचा आवाज ऐकू येईपर्यंत मी ध्यानातून उठणारच नाही. पाश्चात्यांच्या भौतिक उपयोगितावादाच्या धुक्यात मी नाहीसा होऊन जाऊ नये म्हणून मला परमेश्वराचे आशीर्वाद आणि आश्वासन पाहिजे होते. अमेरिकेला जायची तयारी मनाने झालेली होती. त्या दिव्य शक्तीच्या अनुज्ञेचा दिलासा मिळावा अशी तीव्र व उत्कट इच्छा होती.

मी सतत प्रार्थना करीत राहिलो. हुंदक्यावर हुंदके येऊ लागले. पण उत्तर मिळाले नाही. दुपारी कळस झाला. माझ्या यातनांनी डोके भ्रमण करु लागले. आपला मेंदू फुटेल असे वाटायला लागले. आणि त्याचक्षणी आमच्या कलकत्त्याच्या घराच्या पुढच्या दारावर थाप ऐकू आली! मी दार उघडले! आणि काय आश्चर्य! माझ्या दृष्टीसमोर संन्यासी अल्पवेषातील एक तरुण आला. त्याने घरात प्रवेश केला...

''बाबाजीच त्या तरुणाच्या रुपाने आले असावेत! ''माझ्या मनात विचार आला. मी दिपून गेलो. कारण त्या तरुणाचे सारे अवयव लाहिरी महाशयांसारखे तरुणपणीचे होते. माझ्या विचारांना त्यांनी उत्तर दिले, ''होय! मी बाबाजीच आहे. ते हिंदीमध्ये मंजुळपणे बोलू लागले. ''आपल्या स्वर्गस्थ पित्याने तुझी प्रार्थना ऐकली आहे. त्यांनी मला तुला सांगण्याविषयी आज्ञा केली आहे. गुरुंच्या विनंतीप्रमाणे (श्रीयुक्तेश्वरगिरी) अमेरिकेला जा. भिऊ नकोस. तुझी सर्व काळजी घेतली जाईल! ''पाश्चिमात्य जगाला क्रियायोगाचा संदेश देण्यास आणि साधनेचा तिकडे प्रसार करण्याकरता मी तुझी निवड केली आहे! पुष्कळ वर्षापूर्वी तुझे गुरु कुंभमेळ्यात भेटले होते. मी त्यांना सांगितले होते की, तुला त्यांच्याकडे शिक्षणाकरता धाडीन!

त्यांना पाहिल्यावर माझ्या मनात भीतियुक्त आदर वाटला आणि भीतिही वाटली. माझी वाचा कुंठित झाली. श्रीयुक्तेश्वरांकडे पाठविण्यात त्यांनीच मार्गदर्शन केले हे त्यांच्या तोंडून ऐकल्यावर माझे मन हेलावून गेले. त्या अमर गुरुदेवांपुढे मी साष्टांग लोटांगण घातले. त्यांनी मला अनुग्रहपूर्वक उचलून धरले. माझ्या स्वतःच्या आयुष्याबद्दल खूप गोष्टी सांगितल्या. गुप्त भाकिते पण सांगितली. शेवटी गंभीर सुरात ते म्हणाले, ''ईश्वरी साक्षात्कार करवून घेण्याची ही क्रियायोगाची शास्त्रीय तांत्रिक साधना सर्व देशात माहित होईल आणि त्यायोगे

मनुष्यास परमपित्याचे प्रत्यक्ष वरच्या स्तरावर जाऊन दर्शन घडेल. तसे झाले म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंध प्रेमाचे होतील.'' एखाद्या राजन्य पुरुषाने केवळ दृष्टि कटाक्षाने जसे भारावून टाकावे, तसेच गुरुजींनी आपल्या विश्वव्यापी चैतन्य बुद्धीच्या कृपाकटाक्षाने मला विद्युतप्रवाहासारखे भारावून टाकले!

नंतर थोड्यावेळाने ते दरवाजाकडे जाण्यासाठी निघाले. जाताना मला म्हणाले, ''माझ्या पाठीमागे येऊ नकोस. तुला माझ्या पाठीमागे येता येणार नाही!

''बाबाजी कृपा करुन जाऊ नका'' मी सारखा आक्रोश करीत राहिलो. ''मला आपल्याबरोबर घेऊन जा!''

त्यांनी उत्तर दिले. ''आताच नाही. पुढे केव्हा तरी......!! भावनेच्या उद्रेकाने मी त्यांची ताकद न जुमानता त्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला असे जाणवले की, माझे पाय जमिनीला जूण चिकटूनच राहिले आहेत!'' दरवाजातून त्यांनी माझ्याकडे प्रेमळपणाचा एक दृष्टिक्षेप केला. आशीर्वाद देताना हात वर उचलला आणि ते चालू लागले.....''

त्या पुरातन व चिरतरुण गुरुदेवांच्या स्पर्शाने माझे शरीर पुनीत झाले होते. त्यांचे दर्शन व्हावे अशी तीव्र इच्छा मी कितीतरी वर्षे उराशी बाळगून होतो. त्यांच्या माझ्या भेटीची ही हकिकत मी आजपर्यंत कधी कुणाला सांगितली नाही. मनुष्याला मिळणाऱ्या अनुभवांमध्ये हा अत्यंत पवित्र अनुभव असल्याने तो माझ्या हृदयात दडवून ठेवला होता. पण मग विचार आला की, या आत्मचरित्राच्या वाचकांना, एकांतवासात रहाणाऱ्या पण जगाच्या कल्याणाबाबत आस्था बाळगणाऱ्या बाबाजींबद्दल, त्यांच्या अस्तित्वाबद्दल, मी त्यांना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे असे सांगितले की अधिक विश्वास बसेल!!

### योगी एस. ए. ए. रामय्या (१९२३)

रामय्या हे अन्नमलई चेट्टीयार यांचे द्वितीय पुत्र होत. त्यांचे व्रडील दक्षिण भारतातील एक श्रीमंत उद्योगपती होते. ते अत्यंत धार्मिक आणि आध्यात्मिक प्रवृत्तीचे होते. रामय्या यांनी मद्रास विद्यापीठाची 'जिऑलॉजी या विषयाची पदवी संपादन केली होती. पोस्ट ग्रॅज्युएशनच्या अभ्यासासाठी अमेरिकेला जाण्याच्यावेळी त्यांच्यावर हाडाच्या क्षयरोगाने हल्ला केला. रामय्यांचा हाडाचा क्षयरोग दुर्धर स्थितीला पोहोचला. अत्यंत निराश मन:स्थितीत आणि यातनांनी बेजार होऊन श्वास निरोध करुन त्यांनी आपल्या जीवनाचा अंत करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी एक अत्यंत मधुर आणि मंजूळ आवाज त्यांच्या कानी पडला, ''हे माझ्या मुला, तू तुझ्या जीवनाचा असा शेवट करु नकोस. ते जीवन तू मला दे!'' रामय्यांनी दीर्घ श्वास घेतला आणि बाबाजींचा आवाज ओळखला. त्यांना ते शरण गेले.. दुसऱ्यादिवशी त्यांच्या दुखऱ्या पायात सुधारणा झाल्याची चिन्हे दिसून आली आणि सर्व डॉक्टर्सना आश्चर्याचा धक्का बसला. रामय्या त्या आजारातून पूर्ण बरे झाले. त्या काळात रामय्यांना एक दृष्य दिसले. त्यांना त्या दृष्यात बाबाजी लंगडतांना दिसले. कारण विचारल्यावर बाबाजी म्हणाले त्यांचा शिष्य बरा व्हावा म्हणून काही काळ त्याचे दुखणे त्यांनी आपल्या स्वत:च्या देहात ओढवून घेतले आहे!

१९५५ साली हिमालय प्रदेशात बाबाजींनी स्वत: क्रियायोग तंत्राच्या विविध पद्धती रामय्यांना शिकवल्या आणि दीक्षा दिली. रामय्यांनी सुद्धा अत्यंत प्रामाणिकपणे या क्रियातंत्रांचा अभ्यास आणि सराव केला. बाबाजींच्या कृपाप्रसादाने हाडाच्या क्षयरोगी रोग्याचे रुपांतर एका महान योग्यात झाले. मुंबईच्या बी. जे. मेडिकल कॉलेजात फिजिकल थेरपीचे शिक्षण घेऊन त्या थेरपीचा त्यांनी उपयोग करण्यास सुरुवात केली. अपंग लोकांसाठी जवळजवळ एक दशकभर एक क्लिनिक सुद्धा त्यांनी मद्रासमध्ये चालवले.

### व्ही.टी. नीलकांतन (१९०१)

श्री. व्ही. टी. नीलकांतन हे फार मोठे पत्रकार असून मद्रास विद्यापीठाचे पदवीधर होते. जवाहरलाल नेहरु यांचे ते मित्र होते. थिऑसॉफिकल सोसायटीच्या डॉ. ॲनी बेझंट यांचे अतिशय जवळचे विद्यार्थी होते. नीलकांतन सुद्धा मधुमेह, डिसेंट्री, पायाचे अल्सर, ताप अशा अनेक व्याधींनी ग्रस्त झालेले होते. श्री बाबाजींनी पण त्यांच्यावर खूप उपचार केले होते. नीलकांतन यांची भक्ती पाहून बाबाजींचे अंत:करण द्रवून जात असे. एका रात्री 'झीरो' आवरला बाबाजी नीलकांतन यांच्या पूजा घरात प्रगट झाले आणि त्यांनी नीलकांतन यांना स्पष्टपणे त्यांच्या कार्यासंबंधीच्या पुस्तकाचे लेखन करण्याचा आदेश दिला. त्या पुस्तकाचा मजकूर स्वत: बाबाजी सांगणार होते! त्यावेळी बाबाजी त्यांना म्हणाले, " I am going to use your brain and your pen!!" नीलकांतन यांना

स्वत: बाबाजींनी सांगितलेली तीन पुस्तके लिहिण्याची संधी मिळाली. त्या पुस्तकांची नावे सुद्धा बाबाजींनी सांगितलेली होती. संपूर्ण पुस्तकाचे नाव The Voice of Babaji-A Trlogy on Kriya Yoga ''महावतार बाबाजींची दिव्यवाणी - क्रियायोगावरील तीनखंड

Book I - Dialogue - The Voice of Babaji संभाषण -बाबाजींची दिव्यवाणी

Myticism unlocked रहस्य उलगडले

Book II - Dialogue - In Tune with the Omni Scient संभाषण - सर्व ज्ञानी सदगुरुंशी सुसंवाद.

Babajiee's Masterkey to All ills. सर्व दु:ख निर्मूलनावर बाबाजींची गुरुकिल्ली

Book III - Dialogue - The Flame of Kriya संभाषण - क्रियेची ज्वाला,

Babaji's Death of Death बाबाजींची मृत्यूवर मात!

या तीनहि खंडांमध्ये बाबाजींचे प्रगल्भ विचार, त्यांचे भाष्य, त्यांचे प्रगाढ चिंतन, सर्व विश्वाच्या प्रगतीच्या आणि उद्धाराचे कार्य, त्यामागची तळमळ पाहून आपण मंत्रमुग्ध होतो. अंतर्मुख होतो.

बाबाजींनी नीलकांतन यांच्या पूजाघरात प्रगट होऊन स्वमुखाने प्रत्यक्षपणे त्यांना केलेले मार्गदर्शन, संवादात्मक आदेश, ते लिहून घेण्यासाठी दिलेल्या अधिकारयुक्त आज्ञा या सर्वांमधून सद्गुरु बाबाजी, श्री नीलकांतन आणि श्री रामय्या यांच्या अतिशय निकटच्या गुरु-शिष्य संबंधाचे विलोभनीय दर्शन प्रत्येक वेळी घडत होते.

प्रथमखंडात- माणसाला ईश्वर कशासाठी हवा आहे, आध्यात्मिक नैतिक शक्ती, शंकराचार्यांच्या तत्वज्ञानातील अंतिम सत्य, गूढ संगीत, स्वामी रामतीर्थांची महानता, श्री शिवानंदांचे कार्य, अरविंद घोषांचे कार्य या सर्व विषयावरील बाबाजींचे विचार मंत्रमुग्ध करतात.

द्वितीयखंडात - बाबाजींनी या विश्वातील प्रचंड दु:खे आणि समस्या नष्ट करण्यासाठी दिलेली गुरुकिल्ली आहे. त्यासाठी क्रियायोग, त्यातील साधनातंत्रे यांची प्रॅक्टिस करुन स्वत:ला परिपूर्ण बनवावे, चिरंतन सत्याचा शोध घ्यावा, भक्तियोग आणि ज्ञानयोगाचे महत्व जाणावे व आत्मोद्धार कसा करावा याचे फार प्रभावी मार्गदर्शन केले आहे.

तृतीय खंडात- या संवादात क्रियायोगाच्या ज्वालेचा प्रभाव आणि मर्म उलगडले आहे. बाबाजींची मृत्यूवर मात या खंडात, विश्वातील ऐक्य, दीपावली, नवरात्र सारख्या सणांचे महत्व, निरनिराळ्या समाजातील प्रथा यांचे महत्व व ईश्वरी ज्ञानचे स्वर्गीय ज्ञानाचे महत्व, त्यांची उपाययोजना जीवनातील दु:खे नाहीशी करतात. मृत्यूवर मात करतात. मानसिक बंध विमोचनाचे मार्ग, ईश्वराच्या अवर्णनीय शक्तीचे प्रत्यक्ष अनुभव, ईश्वराच्या अमर्याद, असीम शक्तीला कसे जाणावे, ओंकार साधना, मंत्रशक्तीचा प्रभाव, रामनामाचे महत्व, ध्यानाचे महत्व या विविध विषयांवरील बाबाजींचे दिव्य मार्गदर्शन अत्यंत मोलाचे आहे. श्री नीलकांतन यांनी हे लेखन केलेले आहे. इंग्रजी भाषेतील हे पुस्तक जीवनाचा दृष्टीकोनच बदलून टाकते.

अशीही सदगुरू क्रिया मूलगुरु बाबाजी आणि त्यांची शिष्यपरंपरा खरोखर फार अभिमानस्पद आहे. गुरु-शिष्य संबंधाचे फार सुंदर आणि विलोभनीय दर्शन त्यामध्ये घडते. आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिकच विस्तृत होतात आणि क्रियायोगाचे मर्म समजते.

नीलकांतन् म्हणाले ''पुस्तके लिहिली गेली. त्यांचे प्रकाशन पहाण्यासाठी आता जगलो नाही तरी फारसे बिघडणार नाही!'' त्यांचे शरीर कंप पावून ते कोसळून पडू लागले. त्यावेळी बाबाजी ताडकन् आसनावरुन उठले आणि आशीर्वाद दिला. जसा मार्कंडेय ऋषींना सतत १६ वर्षे अमर राहण्याचा वर भगवान शंकराने दिला तसा तू ही ५१ वर्षांपर्यंत जगशील!!

अशा या महान सदगुरुंच्या चरणी नतमस्तक होतांना मन अत्यंत आदराने भरुन येते. डोळ्यात अश्रू येतात. आणि म्हणावेसे वाटते, सदगुरुं तमूनमामि .......!!

संदर्भ - योगी कथामृत - परमहंस योगानंद, गुरुचरित्र

बाबाजी - Babaji and the 18 Siddha Kriya Yoga Tradition By M. Govidnana.

The Voice of Babaji - Trilogy on Kriya Yoga.

**प्रा. सौ. हेमलता सुधाकर जोशी**

फ्लॅट नं. १०, राजमयूर सोसायटी, (२)ए/३,

एरंडवणे, पर्सिस्टंट सॉफ्टवेअरच्या मागे,

कर्वेरोड, पुणे - ४११००४.

दूरध्वनी - ०२० २५४४०५७६.